**आर बी आय/२००५- ०६/ १५३**
**आर पी सि डी. पीएल एन एफ एस. बी. सी. क्रमांक ३९/ ०६.०२.३१/ २००५-०६**

३ सप्टेंबर, २००५

**अध्यक्ष/ चा व्यवस्थापकीय संचालक**
**सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका**

प्रिय महोदय,

**छोट्या व मध्यम व्यवसायिकांची खाती - एक रकमी वसुली - मार्गदर्शक तत्वे.**

आमचे परिपत्रक क्रमांक आर सी पी डी. पी एल एन एफ एस. बी सी. क्रमांक ३१/ ०६. ०२. ३१/ २००५-०६ दिनांक १९ ऑगस्ट २००५ च्या परिच्छेद आठ कडे लक्ष वेधत आहोत. रुपये १० कोटीपेक्षा कमी रक्कम ज्या बुडीत खात्यात आहे अशा खातेदारांकडून एक रकमी वसुली ची योजना सुचवीत आहोत. ही योजना सर्व सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांनी राबवायची आहे. या मार्गदर्शक सुचनांमुळे एम एस ई क्षेत्रातील बुडीत खात्यांकडून एक रकमी वसुलीची यंत्रणा तयार होईल आणि अशी यंत्रणा सोपी, भेदभाव न करणारी, कोणालाही झुकते माप न देणारी असेल. सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँका या मार्गदर्शक तत्वांचे समान अनुपालन करतील.

२. ज्या खात्यात जाणूनबुजून देणी चुकवली गेली आहेत, अफरातफर आहे किंवा बेकायदा कृत्ये झाली आहेत अशा खात्यांना ही मार्गदर्शक तत्वे लागू नाहीत. बँकांनी, अशी चुकार, अफरातफर व बेकायदेशीर कृत्ये करणारी खाती शोधून, त्यांच्यावर त्वरीत कारवाई करावी. त्यानुसार, छोट्या व मध्यम व्यवसाय क्षेत्रांतील बुडीत खात्यांमधून एक रकमी वसूली कशी करावी याच्या मार्गदर्शक सूचना खाली देत आहोत.

**अ) रु १० कोटींपर्यंतच्या जुनाट एन पी एज ची एक रकमी वसूली**

**i). व्याप्ती**

अ) छोट्या व मध्यम व्यवसाय क्षेत्रांतील खाती जी ३१ मार्च, २००४ च्या आधी शंकास्पद वा नुकसान म्हणून वर्गीकृत केली गेली असतील आणि ज्या दिवशी ही खाती शंकास्पद म्हणून वर्गीकृत केली असतील, त्या दिवशी त्यांची मुदतबाह्य देय रक्कम, रुपये १० कोटी किंवा त्यापेक्षा कमी असेल, अशा खात्यांना सुधारीत मार्गदर्शक तत्वे लागू होतील.

ब) जी खाती ३१ मार्च, २००५ रोजी दुय्यम दर्जाची म्हणून वर्गीकृत केली गेली असतील, आणि नंतर ती शंकास्पद वा नुकसानीत गेली असतील, या दिवशी त्या वेळेस मुदतबाह्य देय रक्कम जर रुपये १० कोटी किंवा कमी असेल अशा खात्यांनाही ही तत्वे लागू होतील.

क) ज्या खात्यांच्या बाबतीत बँकेने 'सिक्युरिटायझेशन '/ रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल ऍसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ द्वारे कारवाई सुरू केली असेल किंवा ज्या खात्यांची प्रकरणे न्यायालये/ डी आर टी/ बी आय एफ मध्ये प्रलंबित असतील, अशा खात्यांच्या बाबतीतही ही मार्गदर्शक तत्वे लागू होतील. अर्थात न्यायालय/ डी आर टी/ बी आय एफ आर ने या तडजोडीला पूर्व - मान्यता दिली असली पाहिजे.

ड) जाणुनबुजून केलेला चुकार, अफरातफर आणि बेकायदा कृत्ये ज्या खात्यांत आहेत अशा खात्यांना सदर योजना लागू नाही.

इ) ३१ मार्च, २००६ रोजी बँकां ग्राहकांसाठी बंद होण्यापूर्वी संबंधीत कर्जदार खातेदारांने या योजनेत सामिल होण्यासाठींचा केलेला अर्ज बँकेला मिळेल असा सादर करावा. सदर अर्जावरील कारवाई. या सुधारीत तत्वांप्रमाणे करून ३० जून, २००६ पर्यंत प्रकरण निकालात काढावे.

**ii) वसूलीचे सूत्र - रक्कम**

**अ) ३१ मार्च, २००४ रोजी शंकास्पद वा नुकसान म्हणून वर्गीकृत केलेली बुडीत खाती.**

सुधारित मार्गदर्शकतत्वांनुसार ज्या दिवशी वरील खाती शंकास्पद म्हणून वर्गीकृत केली असतील या दिवशी मुदतबाह्य कर्जफेडीची असलेली रक्कम, या एक रकमी वसूली योजनेखाली देय रक्कम म्हणून ठरवली जाईल. ती पूर्ण रक्कम (१००% थकित) वसूल हॊईल असे पहावे.

**ब) ३१ मार्च, २००४ रोजी दुय्यम दर्जाची म्हणून वर्गीकृत केलेली व नंतर शंकास्पद किंवा नुकसानीची ठरविली गेलेली बुडित खाती.**

मार्च ३१, २००४ रोजी दुय्यम दर्जाची म्हणून वर्गीकृत केलेल्या व नंतर शंकास्पद किंवा नुकसानीची म्हणून ठरविलेल्या, बुडित खात्यांकडील किमान वसूलीची रक्कम, ही, ज्या दिवशी ती खाती बुडित ठरविली गेली, त्या दिवशी, त्या खात्यावर असलेली १००% न फेडलेलि रक्कम, अधिक १ एप्रिल २००४ पासून अंतिम प्रदानाच्या तारखेपर्यंतच्या कालासाठी प्राईम लेंडींग रेट च्या व्याजदराने द्यावयाचे व्याज एवढी असेल.

**iii) प्रदान**

वरील दोन्ही प्रकारात, देय असलेली हिशेबपूर्तीची रक्कम कर्जदाराने शक्यतो एक रकमी द्यावी.कर्जदाराला पूर्ण रक्कम एक रकमी देणे शक्य नसल्यास, सुरवातीला २५% रक्कम एकदम द्यावी व उरलेली ७५% बाकी, पुढे वर्षभरात हप्त्याहप्त्यांनी द्यावी. कर्जदाराने दुसरा पर्याय स्वीकारला तर त्याला बँकेच्या प्राथमिक कर्जदराप्रमाणे तडजोडीच्या तारखेपासून अंतिम प्रदानाच्या तारखेपर्यंतच्या कालाचे व्याज द्यावे लागेल.

## iv) मंजुरकर्ते अधिकारी

एक रकमी कर्जवसूली योजनेखाली, बँकेला देय असलेल्या रक्कमेतून कर्जदाराला सूट माफी किंवा रद्द करणे यांचा निर्णय तो घेण्याचा अधिकार असलेला सक्षम अधिकारीच घेऊ शकतो.

## v) भेदभाव रहित वागणुक

कोणताही भेदभाव न ठेवता सर्व बुडीत खात्यांच्या बाबतीत बँकांनी या एक रक्कमी कर्जफेडीच्या योजनेचा लाभ मिळू द्यावा. दर महिन्याला या योजनेखाली किती दावे निकाली निघाले तसेच इतर प्रगतीचा अहवालही सक्षम संबंधित अधिकाऱ्याने आपल्या वरीष्ठ अधिकाऱ्याला, तसेच मध्यवर्ती कार्यालयाला सादर करावा. बँकांनी या योजनेला भरपूर प्रसिध्दी द्यावी. जे कर्जदार या एक रकमी कर्ज वसूली योजनेचा लाभ घेण्यास योग्य असतील त्यांना ३१ जानेवारी, २००६ पूर्वी सूचित करावे. या योजनेला वेगवेगळ्या प्रकारे भरपूर प्रसिध्दी मिळेल असे पहावे.

## vi) संचालक मंडळाला सादर करण्याचा अहवाल :-

सुधारित योजनेप्रमाणे जुन्या थकीत/ बुडीत खात्यांच्या एक रक्कमी वसुलीच्या संबंधातील प्रगतीचा त्रैमासिक अहवाल बँकांनी आपल्या संचालक मंडळाला सदर करावा व त्याची एक प्रत आम्हाला पाठवावी.

३. या सुधारित योजनेची माहिती आपली संबंधीत कार्यालये आणि शाखा यांना पाठवावी व त्यांना योजनेची त्वरित अंमलबजावणी करावयास सांगावे. बँकेने या योजनेची माहिती आपल्या आपल्या वेबसाईटवरही द्यावी.

४. कोणत्याही कर्जदारासाठी वरील योजनेत काही फेरबदल करावे लागत असल्यास तसे अधिकार संचालक मंडळालाच आहेत.

५. कृपया पोच द्यावी.

आपल विश्वासू,

**(जी. श्रीनिवासन)**
मुख्य महाव्यवस्थापक